विद्या प्रसारक मंडळ संचालित

अमोलकचंद महाविद्यालय
यवतमाळ

अमोलकचंद वार्ता

ISSUE NO.01
July, August, September 2026





डॉ. अजय लाड
(मुख्य संपादक)
प्राचार्य, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ



देवदत्त शरद धारणे
(सहसंपादक)
सहा. प्रा., इंग्रजी विभाग, अमोलकचंद महाविद्यालय



आनंद शरद काकडे
(सहसंपादक)
सहा. प्रा., भौतिकशास्त्र विभाग, अमोलकचंद महाविद्यालय

Website:
https://www.amv.ac.in

E-Mail:
priajaylad1726@gmail.com
amvoffice@amv.ac.in

Address:
Godhani Road, Yavatmal-445001

Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
Admission 2026-27

Class	I	II	III	
B.A.	438	220	100	
B.Com.	172	80	124	
B.Sc.	333	230	197	
M.A.	I		II	
Economics	86		76	
Political Sci.	88		67	
History	70		51	
English	34		36	
Marathi	81		64	
Hindi	06		11	
M.Sc.	I		II	
Chemistry	22		20	
Physics	09		09	
Zoology	22		20	
Mathematics	15		08	
M.Com.	I		II	
	88		76	
	Arts	Commerce	Science	Voc. (Sci.)
11th	45	76	191	51
12th	64	78	193	70
TOTAL				**3637**

अमोलकचंद महाविद्यालयात स्वातंत्र्य सेनानी श्री जवाहरलाल दर्डा यांची जयंती साजरी





अमोलकचंद महाविद्यालयात ०२ जुलै २०२६ रोजी स्वातंत्र्य सेनानी श्री जवाहरलाल दर्डा यांची जयंती अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. लाड यांनी स्वातंत्र्य सेनानी श्री जवाहरलाल दर्डा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी शिक्षण, पत्रकारिता, समाजकारण आणि विदर्भाच्या सर्वांगीण विकासात स्वातंत्र्य सेनानी श्री जवाहरलाल दर्डा यांनी दिलेल्या अमूल्य योगदानावर विशेष प्रकाश टाकला.

या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक व पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी, महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने महाविद्यालय परिसरात एका विशेष वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. बी. वानखेडे यांनी अत्यंत चोखपणे केले. यावेळी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमोलकचंद महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा



अमोलकचंद महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 11- जुलै रोजी 'जागतिक लोकसंख्या दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. वाढत्या लोकसंख्येचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम आणि त्यावरिल उपाययोजना याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड होते, तर प्रमुख वक्ते म्हणून इंदिरा महाविद्यालय कळंब येथील अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. अजय तगलपल्लेवार हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोलकचंद महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मेटे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधत जागतिक लोकसंख्या दिनाचा इतिहास, उद्देश, यावर्षीची संकल्पना तसेच लोकसंख्या आणि शाश्वत विकास यांचे महत्व विशद केले.

यानंतर प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अजय तगलपल्लेवार यांनी लोकसंख्या ही देशाची शक्ती बनू शकते, जर आपण तरुणांना योग्य शिक्षण आणि कौशल्य दिले. परंतू अमर्याद वाढणाऱ्या लोकसंखेमुळे देशातील संसाधनावर ताण पडतो. ज्यामुळे बेरोजगारी आणि गरिबीसारख्या समस्या उद्भवतात यासाठी योग्य आर्थिक नियोजन आणि जागृती आवश्यक आहे असे नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक म्हणून समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी सामाजिक समतेसाठी विद्यार्थी व सभागृहातील उपस्थितांना " मी लहान कुटूंबाचा पुरस्कार करेल, मुला-मुलींना समान संधी देईल आणि देशाच्या विकासात हातभार लावेल " अशा प्रकारची शपथ दिली.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. विजय दर्डा, उपाध्यक्ष डॉ. ललित निमोदिया, सचिव सी.ए. प्रकाशजी चोपडा व संचालक मंडळ यांनी जागतिक लोकसंख्या दिनाच्या विद्यार्थी, पालक व सर्व प्राध्यापक यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश बेंडे यांनी केले आणि उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. अमोल चंदनखेडे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत भरती प्रक्रिया



१७ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत महाविद्यालयाला १६ प्रशिक्षार्थी मिळाले. त्यामुळे महाविद्यालयात शिक्षकेत्तर व प्रयोगशाळा कर्मचारी यांच्यावर असणारा अतिरिक्त कामाचा ताण कमी होण्यास मदत झाली. तसेच महाविद्यालयाचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज कार्यक्षम होण्यास मदत झाली असून यामुळे महाविद्यावर आर्थिक बोजा कमी झाला.

उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांची जयंती साजरी





अमोलकचंद महाविद्यालयात २२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता स्वर्गीय अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. लाड यांनी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास, सहकार चळवळ आणि जनसेवेतील त्यांच्या उत्तुंग योगदानाला उजाळा देत भावपूर्ण आदरांजली वाहिली. तसेच, अजितदादा पवार यांचे प्रेरणादायी नेतृत्व आणि त्यांची प्रशासकीय दूरदृष्टी आजच्या तरुण पिढीसाठी कशी दिशादर्शक आहे, यावर त्यांनी विशेष प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे अचूक आणि प्रभावी सूत्रसंचालन डॉ. आर. के. मुद्देलवार यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमोलकचंद वार्ता

लोकमान्य टिळक जयंती साजरी



अमोलकचंद महाविद्यालयात २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. लाड यांनी लोकमान्य टिळकांच्या जीवनकार्यावर आणि विचारांवर विशेष प्रकाश टाकला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' या सिंहगर्जनेतून देशवासीयांमध्ये स्वातंत्र्याची प्रखर ज्योत प्रज्वलित करणारे महान स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार आणि समाजसुधारक म्हणून टिळकांनी दिलेल्या अमूल्य योगदानाला डॉ. लाड यांनी यावेळी उजाळा दिला.

या कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन श्री. एस. यू. राठोड यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमोलकचंद महाविद्यालयात रोजगारभिमुख अभ्यासक्रम



२७ जुलै २०२६: विद्या प्रसारक मंडळ संचालित अमोलकचंद महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) आणि संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. विजय दर्डा यांच्या रोजगारभिमुख शिक्षण प्रणालीच्या संकल्पनेनुसार, एका नव्या रोजगारभिमुख 'अप्रेंटिसशिप' (Apprenticeship) अभ्यासक्रमाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने नुकतीच मान्यता दिली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी बी.कॉम. (B.Com.) शाखेसाठी 'अप्रेंटिसशिप-एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' (AEDP) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून हा अभ्यासक्रम सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या अभ्यासक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, विद्यार्थ्यांना त्यांच्या सहाव्या सत्रात (Semester) संबंधित विषयावर आधारित एखाद्या औद्योगिक आस्थापनात किंवा कंपनीत सहा महिन्यांची अप्रेंटिसशिप करणे बंधनकारक असणार आहे. या कालावधीत केंद्र सरकारच्या 'बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंग' (BOAT) मार्फत विद्यार्थ्यांना दरमहा ८,००० ते १०,००० रुपयांचे विद्यावेतन (Stipend) दिले जाईल. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाने यवतमाळमधील एका नामांकित कंपनी आणि औद्योगिक आस्थापनासोबत सामंजस्य करार (MoU) केला आहे. वाणिज्य (Commerce) शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.कॉम.च्या प्रथम वर्षात प्रवेश दिला जात असून, विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी केले आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. प्रवीण जाधव यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अमोलकचंद वार्ता

अमोलकचंद महाविद्यालयात तीन दिवसीय "विद्यार्थी अभिमुखता" कार्यक्रम





अमोलकचंद महाविद्यालयात नवोदित विद्यार्थ्यांसाठी आयोजित तीन दिवसीय 'विद्यार्थी अभिमुखता' (Orientation) कार्यक्रम ३०, ३१ जुलै व १ ऑगस्ट २०२६ रोजी अत्यंत उत्साहात पार पडला. जवळपास ६०० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन किया आणि पार्वती ऑटोमोबाईल्सचे व्यवस्थापकीय संचालक राजेश्वरजी निवल यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय लाड होते. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा आणि सचिव सीए प्रकाश चोपडा यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या.

उद्घाटनीय सत्रात निवल यांनी विद्यार्थ्यांना नोकरी शोधणारे न बनता रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनण्याचे आवाहन केले, तर प्राचार्य डॉ. लाड यांनी महाविद्यालयीन सुविधांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. या तीन दिवसीय उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020), करिअरच्या संधी, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास आणि संवाद कौशल्य यावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच एनसीसी (NCC), एनएसएस (NSS) आणि इतर विभागांची ओळख करून देण्यात आली. या दिशादर्शक कार्यक्रमाची सांगता निसर्ग आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या 'ऑक्सिजन पार्क'मधील शैक्षणिक सहलीने झाली.



विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या.

'हर घर तिरंगा' अभियान, 'ऑगस्ट क्रांति दिवस', 'जागतिक आदिवासी दिवस' व स्वच्छता मोहीम





अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील एन.सी.सी. युनिट (कंपनी १/४७ महाराष्ट्र बटालियन, एन.सी.सी. यवतमाळ) यांच्या वतीने दिनांक ०९ ऑगस्ट २०२६ रोजी 'हर घर तिरंगा' अभियान, 'अगस्त क्रांति दिवस' व 'जागतिक आदिवासी दिवस' या तीनही महत्त्वपूर्ण दिवसांच्या उपलक्ष्यात एकत्रित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस कॅडेट शर्वरी सुधाकर सुरजुसे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर लेफ्टनंट डॉ. के.ए. तुमसरे, यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी 'हर घर तिरंगा' अभियान, 'ऑगस्ट क्रांति दिवस' व 'जागतिक आदिवासी दिवस' या तिन्ही दिवसांचे महत्त्व सविस्तरपणे स्पष्ट केले. विशेषतः ०९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू झालेल्या 'भारत छोडो आंदोलना'चा उल्लेख करत 'ऑगस्ट क्रांति दिवसा'चे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित केले. तसेच या दिवशी घेण्यात आलेल्या स्वच्छता अभियानाचा उद्देशही त्यांनी विशद केला.



प्रास्ताविकानंतर चार कॅडेट्सनी आपले मनोगत व्यक्त केले. कॅडेट रुतुजा दिके, कॅडेट अनुष्का सातपुते, कॅडेट रुचिका वाकळे आणि कॅडेट तुषार यांनी अनुक्रमे 'हर घर तिरंगा', 'अगस्त क्रांति दिवस', 'जागतिक आदिवासी दिवस' व स्वच्छता अभियान या विषयांवर आपले विचार मांडले. तत्पश्चात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले प्राचार्य, आ. डॉ. अजय लाड यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यांनी सर्व कॅडेट्सना मार्गदर्शन करताना या तिन्ही दिवसांचे महत्त्व पटवून दिले व देशभक्ती, स्वातंत्र्य चळवळ व आदिवासी संस्कृती यांच्या जाणिवेतून येणाऱ्या प्रेरणेबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

सर्व भाषणानंतर कॅडेट समृद्धी रवींद्र सातपुतरे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यानंतर 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये एन.सी.सी. कॅडेट्सनी उत्साहाने भाग घेतला व नागरिकांना तिरंग्याचे महत्त्व पटवून दिले. रॅली संपन्न झाल्यानंतर अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कॅडेट्सनी परिसरातील कचरा संकलन करून 'स्वच्छ भारत' अभियानाचा संदेश दिला.

या कार्यक्रमास ७० एन.सी.सी. कॅडेट्स, २ पी.आय. स्टाफ (४७ महाराष्ट्र बटालियन, एन.सी.सी. यवतमाळ) व क्रीडा शिक्षक संजय पंदिरवाड उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. एन.सी.सी. युनिटच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, स्वच्छता व सामाजिक जाणीवेचा संदेश पोहोचला.

अमोलकचंद वार्ता



जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या 'यवतमाळ जिल्हा अजिंक्यपद ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धा २०२६' मध्ये अमोलकचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. यातील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूची आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी थेट निवड झाली आहे.

सुमित पाटील: १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सर्वोत्तम कामगिरी करत सुमितने प्रथम क्रमांक पटकावला आणि 'सुवर्णपदक' आपल्या नावे केले. या सुवर्णवेधी कामगिरीच्या जोरावर त्याची थेट राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संजीव पाटील: याच १०० मीटर धावण्याच्या क्रीडा प्रकारात संजीवनेही उत्तम प्रदर्शन करत तृतीय क्रमांक मिळवला.

युवराज चिल्लावर: लांब उडी स्पर्धेमध्ये युवराजने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत 'कांस्यपदक' पटकाविले.

या सर्व खेळाडूंनी मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, सचिव आणि कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

तसेच, या गुणवंत खेळाडूंचे अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड, उपप्राचार्य व्ही. सी. जाधव, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. किशोर तायडे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक प्रा. संजय पंदिरवाड यांनी पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले व राज्यस्तरीय स्पर्धेतील पुढील यशस्वी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे संपूर्ण महाविद्यालयात व क्रीडा वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.



ऑल इंडिया आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल चॅम्पियनशिपमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणारे अमोलकचंद महाविद्यालयाचे उत्कृष्ट खेळाडू भाकीत मेश्राम आणि कुणाल लोणारे यांचा विद्यापीठातर्फे ५,००० रुपये रोख, प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला.

या यशाबद्दल अमोलकचंद महाविद्यालयात आयोजित एका कार्यक्रमात या खेळाडूंचा भव्य सत्कार करण्यात आला. हा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड, प्रमुख अतिथी तथा नांदेडचे राज्य क्रीडा मार्गदर्शक बालाजी शिरसेकर आणि सुप्रसिद्ध मार्शल आर्ट्स ग्रँडमास्टर आढाव सर यांच्या हस्ते पार पडला.

याप्रसंगी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. किशोर तायडे आणि प्रा. संजय पंदिरवाड उपस्थित होते. या लक्षवेधी कामगिरीबद्दल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात 'ग्रंथपाल दिन' (Librarian Day) मोठ्या उत्साहात साजरा



अमोलकचंद महाविद्यालयाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातर्फे १२ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात 'ग्रंथपाल दिन' (Librarian Day) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड उपस्थित होते. तर, कार्यक्रमाचे आयोजक आणि समन्वयक म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अमोल चंदनखेडे यांनी धुरा सांभाळली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. अमोल चंदनखेडे यांनी मान्यवरांचे स्वागत करत प्रास्ताविक केले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील ग्रंथालयाचे अनन्यसाधारण महत्त्व विशद केले. तसेच, ई-लायब्ररी (E-library), वाचन कक्ष, संदर्भ विभाग, स्पर्धा परीक्षांची पुस्तके आणि एन-लिस्ट (N-LIST) यांसारख्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध अत्याधुनिक सुविधांवर त्यांनी प्रकाश टाकला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी 'डिजिटल युगातील वाचन संस्कृतीचे महत्त्व' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ''ग्रंथालय हे कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे हृदय असते आणि पुस्तके हीच विद्यार्थ्यांची सर्वोत्तम मित्र असतात.'' ग्रंथालय अधिक विद्यार्थीभिमुख आणि डिजिटल करण्यासाठी प्रा. चंदनखेडे यांनी घेतलेल्या पुढाकाराचे आणि प्रयत्नांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल चंदनखेडे यांनी केले, तर प्रा. सार्थक ठाकरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वनस्पतीशास्त्र विभागातर्फे रानभाजी प्रदर्शन








अमोलकचंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे १३ ऑगस्ट २०२६ रोजी पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञानाची सांगड घालणाऱ्या एका आगळ्यावेगळ्या 'रानभाजी प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड आणि IQAC समन्वयक डॉ. माधुरी भादे यांच्या हस्ते उद्घाटित झालेल्या या उपक्रमात, बी.एस्सी.चे विद्यार्थी आणि तीन स्थानिक महिला बचत गटांचा अनोखा समन्वय पाहायला मिळाला. एकीकडे ग्रामीण महिलांनी रानभाज्यांचे संकलन आणि पारंपरिक पाककृतींचे धडे दिले, तर दुसरीकडे विद्यार्थ्यांनी कुर्डू, टाकळा आणि शेवगा यांसारख्या भाज्यांची शास्त्रीय माहिती व पोषणमूल्ये उलगडून सांगितली. विविध शाखांतील प्राध्यापकांच्या उत्स्फूर्त सहभागातून जैवविविधता संवर्धन, अनुभवाधारित शिक्षण आणि पारंपरिक अन्नसुरक्षेचा प्रसार करण्यात हे प्रदर्शन अत्यंत यशस्वी ठरले.

अमोलकचंद वार्ता

वारली चित्रकला स्पर्धा





अमोलकचंद महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपल्या महाविद्यालयात १५ ऑगस्ट निमित्त दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी वारली चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी नी श्री.वसंतराव नाईक सभागृहामध्ये फुलझाडांच्या कुंड्यां न वर वारली पेंटिंग काढली आहे.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे सर्व स्पर्धक आपापले कला, योग्यता, टॅलेंट , समाजातील सर्व बाबींवर आपल्या कलाच्या दृष्टिकोनातून या कुंड्यांवरती वारली पेंटिंग दर्शविल्या. या स्पर्धेमध्ये जवळपास सर्वच विद्यार्थ्यांचे अव्वल दर्जाचे वारली पेंटिंग बघण्यात आले.

सर्व कलाकारांचे प्राचार्य डॉ अजय लाड सरांनी कौतुक व प्रशंशा केली. महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी या विद्यार्थ्यांचे कलेचे अभिनंदन व कौतुक केले

अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथे ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा







अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७:१५ वाजता महाविद्यालय परिसरात ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या देशभक्तीपूर्ण उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्या प्रसारक मंडळाचे सचिव सीए प्रकाशजी चोपडा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व इतर कार्यकारी मंडळासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली.

या कार्यक्रमात, प्रमुख पाहुणे सीए प्रकाशजी चोपडा यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे कौतुक केले आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत तरुणांच्या भूमिकेवर भर दिला. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना घटनात्मक मूल्यांचे जतन करण्याचे आणि शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसी (NCC) कॅडेट्स, एनएसएस (NSS) स्वयंसेवक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वय सांस्कृतिक समितीने केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेफ्टनंट डॉ. के. ए. तुमसरे यांनी कुशलतेने केले. चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली. जय हिंद.

राष्ट्रीय सेवा योजना यांच्या अंतर्गत
‘विकसित भारत - नशामुक्त युवा’ हा कार्यक्रम संपन्न



महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी ‘विकसित भारत - नशामुक्त युवा’ या विशेष कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

देशाच्या युवा पिढीला व्यसनाधीनतेपासून दूर ठेवून एका सशक्त आणि विकसित भारताची निर्मिती करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अखेरीस उपस्थित सर्व विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी 'स्वतः व्यसनापासून दूर राहून नशामुक्त जीवन जगण्याची आणि समाजातील इतर घटकांनाही व्यसनमुक्तीसाठी प्रवृत्त करण्याची' सामूहिक शपथ घेतली.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला

NEP-२०२० च्या अनुषंगाने शैक्षणिक कार्यभार निश्चितीबाबत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा



दिनांक 18 ऑगस्ट 2026 रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमानाने NEP-20 Workload distribution या विषयावर यवतमाळ जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालय प्राचार्य, IQAC समन्वयक, एनईपी समन्वयक, प्राध्यापक त्यांच्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा श्री वसंतराव नाईक सभागृह,अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथे विद्यापीठाने काढलेले Regulation 11/2026 व 12/2026 वर प्रशिक्षक डॉ. प्रसाद खानझोडे, प्राचार्य, लोकमान्य टिळक,वणी व डॉ. दीपक धोटे प्राचार्य,बिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांनी संपूर्ण माहिती देवून संवाद साधला व तसेच डॉक्टर वैशाली गुडघे, अधिष्ठाता,आंतरविद्याशाखा यांच्या उपस्थितीत संपन्न झाली या कार्यशाळेमध्ये जवळपास 100 नोंदणी सदस्यांनी सहभाग घेतला.

स्मार्ट डिफॉस्टिंग तंत्रज्ञानासाठी संशोधकांना पेटंट मंजूर



रेफ्रिजिरेशन आणि कोल्ड स्टोरेज क्षेत्रातील वीज वापर कमी करून उपकरणांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या (RTMNU) संशोधकांनी तयार केलेल्या 'ऑटोमेंटिक मायक्रोकंट्रोलर बेस्ड आईस डिफ्रॉस्टिंग इन्स्टुमेंट या उपकरणाला पेटंट मंजूर झाले आहे.

पारंपारिक पद्धतीने वेळेनुसारचालणान्या डिफॉस्टिंग प्रणालीमुळे मोठ्या प्रमाणावर विजेचा अपव्यय होतो आणि तापमानात चढ-उतारमुळे विजेचा अपव्यय होतो. हे रोखण्यासाठी या नवीन प्रणालीमध्ये मायक्रोकंट्रोलर, रिअल टाइम सेन्सर्स आणि आयओटी (IoT) क्लाउड तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे ज्यात भौगोलिक परिस्तिथिनुसार तापमान कार्यान्वित करणे सहज शक्य होणार आहे. यामुळे फ्रीजमध्ये आवश्यकतेनुसारच डिफ्रॉस्टिंग प्रक्रिया सुरु होऊन कॉम्प्रेसर ला लागणाऱ्या विद्युत वापरात कमालीची बचत होणार आहे. या शोधामुळे घरातील फिज सोबतच पावसाळा, हिवाळा ऋतूत गाड्यांच्या स्क्रीन, समोरील आरसा किंवा चष्म्याचे ग्लास यावर वातावरणामुळे तयार होणारे धुके वेळीच कडून टाकणे आता शक्य झालेले आहे तसेच धुके घालविण्याकरीला लागणाऱ्या गाडीतील AC चा वापर कमी करून ऊर्जा बचतीचा मार्ग शोधण्यात यश आलेले आहे

या तंत्रज्ञानामुळे घरगुती व व्यावसायिक फ्रीज, कोल्ड स्टोरेज आणि एचव्हॅक (HVAC), मोठ्या गाड्यातील सिस्टीममधील ऊर्जेची बचत होण्यासोबतच अन्न व औषधांसारख्या संवेदनशील वस्तूंचे मोठ्या कालावधीकरिता संरक्षण होईल. या संशोधन पथकात डॉ. संजय ढोबळे, डॉ. अनुप भट डॉ. गोविंद नायर, डॉ. विभा चोप्रा, आणि डॉ. निरुपमा ढोबळे यांचा समावेश आहे. व्यावसायिक उत्पादन व वापरासाठी हे पथक उद्योग क्षेत्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक आहे.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. विजय दर्डा व सर्व सन्माननीय सदस्यांनी डॉ. अनुप भट यांचे कौतुक केले. या शोधाकरिता अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अजय लाड, व प्राद्यापकवृंद यांनी नावीन्यपूर्ण शोधाकरिता अभिनंदन केले.

अमोलकचंद महाविद्यालयात भारताचे माजी पंतप्रधान, भारतरत्न स्व. श्री. राजीव गांधी यांची जयंती उत्साहात साजरी.





दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी अमोलकचंद महाविद्यालयात भारताचे माजी पंतप्रधान, भारतरत्न स्व. श्री. राजीव गांधी यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि आदराने साजरी करण्यात आली.
हा दिवस देशभरात 'सद्भावना दिवस' म्हणूनही ओळखला जातो, या औचित्याने महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते

राष्ट्रीय क्रीडा दिवस



अमोलकचंद महाविद्यालयात २९ ऑगस्ट २०२६ रोजी, हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय क्रीडा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत महाविद्यालयातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पातळीवर चमकलेल्या गुणवंत खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून यवतमाळचे क्रीडा अधिकारी श्री. सचिन हरणे उपस्थित होते.

याप्रसंगी अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. यामध्ये सत्कारमूर्ती आणि यवतमाळ जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सचिव डॉ. अविनाश लोखंडे यांचा समावेश होता. डॉ. लोखंडे हे 'नंददीप फाउंडेशन' आणि 'संकल्प फाउंडेशन' च्या माध्यमातून सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे व्यक्तिमत्व आहेत. यासोबतच, 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये नोंद करणारे यवतमाळचे सुपुत्र व आंतरराष्ट्रीय धावपटू देव चौधरी, तसेच राष्ट्रीय कबड्डीपटू, क्रीडा पंच आणि क्रीडा शिक्षक श्री. संजय सातारकर यांनी प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

सकाळ सत्राचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. गणेश खंडेराव, राष्ट्रीय सेवा योजनेचे (NSS) कार्यक्रम अधिकारी प्रा. शशिकांत राठोड, डॉ. सिंधी मॅडम आणि शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संजय पंदिरवाड हे देखील मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर, महाविद्यालयातील ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाचे आणि जिल्ह्याचे नाव उंचावले आहे, अशा सर्व गुणवंत खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि ट्रॅकसूट देऊन विशेष गौरव करण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक केले आणि तरुणांनी शारीरिक सुदृढतेसाठी खेळांमध्ये नियमित सहभाग घेण्याचे आवाहन केले. खेळांमुळे जीवनात शिस्त, संघर्ष करण्याची वृत्ती आणि सांघिक भावना कशी निर्माण होते, यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

या शानदार कार्यक्रमाचे अत्यंत सूत्रबद्ध आणि बहारदार संचालन डॉ. प्रा. यशवंत खंदारे यांनी केले, तर शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संजय पंदिरवाड यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे राष्ट्रीय क्रीडा दिनाचा हा कार्यक्रम अत्यंत संस्मरणीय ठरला.

अमोलकचंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा पंतप्रधान मोदींसोबत 'खेलो इंडिया संवाद'







संस्थानिक अमोलकचंद महाविद्यालयात २७ ऑगस्ट २०२६ रोजी 'खेलो इंडिया संवाद' उपक्रमांतर्गत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या थेट ऑनलाइन संवादाचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. या प्रेरणादायी कार्यक्रमात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे (NSS) स्वयंसेवक आणि गुणवंत खेळाडूंनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

प्राचार्य डॉ. अजय लाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात पंतप्रधानांनी तरुणांना क्रीडा संस्कृती, 'फिट इंडिया' आणि शारीरिक सुदृढतेचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा संचालक प्रा. किशोर तायडे, प्रा. संजय पंदिरवाड आणि NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. शशिकांत राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





अमोलकचंद महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने 'महाविद्यालयीन सामाजिक दायित्व' (Institutional Social Responsibility) या उपक्रमांतर्गत शालेय खेळाडूंना मदतीचा हात देण्यात आला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांच्या पुढाकाराने शालेय सॉफ्टबॉल खेळाडूंना सरावासाठी महाविद्यालयाचे मैदान उपलब्ध करून देण्यासोबतच, त्यांना 'सॉफ्टबॉल कॅचर किट' (Softball Catcher Kit) भेट देण्यात आली.

या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. किशोर तायडे, श्री. संजय पंदिरवाड आणि महाविद्यालयाच्या सॉफ्टबॉल संघातील खेळाडूंच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी उपस्थित शालेय खेळाडूंना आगामी क्रीडा स्पर्धांसाठी बहुमोल मार्गदर्शन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस उज्ज्वल शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयातर्फे देण्यात आलेली ही क्रीडा साहित्याची भेट शालेय खेळाडूंचे प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू भाकित मेश्राम, पियुष चांदेकर आणि पंकज शिरोडकर यांनी स्वीकारली.

महाविद्यालयाने खेळाडूंना दिलेल्या या प्रोत्साहन आणि सहकार्याबद्दल सर्व प्रशिक्षकांनी व खेळाडूंनी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा, सचिव सी.ए. प्रकाश चोपडा आणि संपूर्ण अमोलकचंद महाविद्यालय परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमामुळे शालेय स्तरावरील खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून क्रीडा वर्तुळातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे.



29 ऑगस्ट 2026 राष्ट्रीय क्रीडा दिन अमोलकचंद महाविद्यालयात क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागातर्फे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय खेळाडू श्री. देव चौधरी, (120-150 किलो मीटर धावण्याचा विक्रम करणारा) डॉ.अविनाश लोखंडे, श्री. सचिन हरणे, क्रीडा अधिकारी, यवतमाळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.सदर कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दोरीवरील खेळाचे प्रात्यक्षिक दाखविले. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, विद्यापीठ, राज्यस्तरीय खेळाडू विद्यार्थ्यांचा व तसेच इतर उपक्रमांमध्ये भाग घेतलेला विद्यार्थ्यांचा ट्रॅक सूट, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



अमरावती विभागीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धेत अमोलकचंद महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. १९ वर्षांखालील मुलांच्या (९० किलोखालील) गटात आदर्श दीपक जाधव याने सुवर्णपदक पटकावले असून, त्याची २८ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच, मुलींच्या (६५ किलोखालील) गटात यवतमाळचे प्रतिनिधित्व करताना कु. रिधिमा देशमुख हिने रौप्यपदक मिळवले. या लक्षवेधी यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी दोन्ही यशस्वी खेळाडूंचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील राज्यस्तरीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

वनस्पतीशास्त्र विभागाचा 'विंग्ज अँड वाईल्ड' उपक्रम







अमोलकचंद महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे ४ सप्टेंबर २०२६ रोजी महाविद्यालय परिसर आणि बोटॅनिकल गार्डनमध्ये 'विंग्ज अँड वाईल्ड' या नाविन्यपूर्ण क्षेत्रभेट (Field Activity) उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

डॉ. रुपाली कैकाडे , प्रा. अनघा अनमोड आणि डॉ. संदीप पडवळ यांच्या समन्वयाखाली पार पडलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्थानिक वनस्पती आणि परागकण वाहकांचा (Pollinators) प्रत्यक्ष अभ्यास केला.

याअंतर्गत विद्यार्थ्यांनी मधमाश्या, फुलपाखरे, मुंग्या व पक्षी यांचा विविध वनस्पतींशी (जसे की टेकोमा, कुर्डू) असलेला परस्परसंबंध नोंदवत, स्मार्टफोनच्या साहाय्याने परिसरातील जैवविविधतेचा डिजिटल डेटाबेस तयार केला.

केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष संशोधनाशी सांगड घालणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण साक्षरता वाढीस लागली असून, 'ग्रीन कॅम्पस' संवर्धनाच्या उद्दिष्टांना मोठे बळ मिळाले आहे.

ZOOLOGICAL SOCIETY 2026–27 चा उद्घाटन सोहळा





अमोलकचंद महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र (ZOOLOGY) विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी 'झुलॉजिकल सोसायटी'चे ८ सप्टेंबर २०२६ रोजी दिमाखात उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्याला बी.एस्सी. आणि एम.एस्सी.च्या १७० हून अधिक विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने, ऑगस्ट महिन्यात लोकशाही प्रक्रियेचा अवलंब करत सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक पार पडली. यामध्ये हर्षदीप भगत याची अध्यक्ष म्हणून, तर मौली ओसवाल, सत्यम पांडे, सौरवी पालगे आणि देवांशु लांजेवार यांची इतर महत्त्वाच्या पदांवर निवड करण्यात आली. उद्घाटन सोहळ्यात या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना बॅज लावून सन्मानित करण्यात आले. प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी.पी.जोशी यांनी सोसायटीच्या आगामी उपक्रमांची व उद्दिष्टांची रूपरेषा विशद केली. त्यानंतर मावळत्या अध्यक्षा अंकिता यादव हिने मागील शैक्षणिक वर्षाच्या कामकाजाचा अहवाल सादर केला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, निवृत्त वरिष्ठ विभागीय वन अधिकारी (DFO) श्री. राजन टोंगो यांनी 'जंगल, वन्यजीव आणि पर्यावरण' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी वन्यजीव संवर्धन आणि पर्यावरणाप्रती असलेल्या आपल्या जबाबदारीची नितांत गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड होते. त्यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत, भविष्यातील सर्व शैक्षणिक आणि वैज्ञानिक उपक्रमांसाठी महाविद्यालयाच्या वतीने भक्कम पाठिंबा राहील, अशी ग्वाही दिली.

डॉ. एस. एस. गुप्ता यांच्या समन्वयाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सौरवी पालगे हिने केले, तर इकरा शेख हिने मानलेल्या आभार प्रदर्शनाने या सोहळ्याची सांगता झाली. या यशस्वी आयोजनातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या एका नव्या पर्वाची अधिकृतपणे सुरुवात झाली आहे.

वनस्पतीशास्त्र विभागातर्फे 'जागतिक ओझोन दिन'



अमोलकचंद महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे 'जागतिक ओझोन दिना'निमित्त (१६ सप्टेंबर २०२६) पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या विशेष चर्चासत्र (Seminar) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

हवामान बदल आणि वनस्पतींवर अतिनील किरणांचा (UV Radiation) होणारा परिणाम याविषयी विद्यार्थ्यांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे अत्यंत अभ्यासपूर्ण माहिती सादर केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी त्यांनी पर्यावरण रक्षणातील तरुणांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला. विभागप्रमुख डॉ. रुपाली कैकाडे , डॉ. संदीप पडवळ, डॉ. मंजुश्री महालकर आणि प्रा. आचल उघाडे यांच्या अचूक समन्वयातून हा स्तुत्य उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

PHYSICS SOCIETY 2026-27 चा उद्घाटन सोहळा



अमोलकचंद महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र (Physics) विभागांतर्गत 'फिजीक्स सोसायटी'चा उद्घाटन सोहळा २३ सप्टेंबर २०२६ रोजी श्री. वसंतराव नाईक सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांच्या हस्ते झाले व त्यांनीच या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानही भूषविले.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. लाड यांनी भौतिकशास्त्र विभागाचे कौतुक केले. तसेच, विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून आपल्यातील जिज्ञासा आणि संशोधक वृत्ती वृद्धिंगत करावी, असे महत्त्वपूर्ण आवाहन त्यांनी केले. यावेळी विद्यार्थी प्रभारी डॉ. आनंद एस. काकडे यांनी 'फिजीक्स सोसायटी'च्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची ओळख करून दिली.

सोसायटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष अंकुश सिकरवार यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सोसायटीची ध्येय-धोरणे व उद्दिष्टे विशद केली. वर्षभरात विद्यार्थ्यांचा अधिकाधिक सहभाग वाढवून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबतची आपली भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कु. कोमल बुकणे हिने केले, तर साहिल गुल्ले याने उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी विविध विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि बी.एस्सी. व एम.एस्सी.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'सायन्स क्लब'चा (विज्ञान मंडळ) उद्घाटन सोहळा



अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील श्री. वसंतराव नाईक सभागृहात विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. विजय दर्डा यांच्या शिक्षण प्रणाली संकल्पनेतून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतर्फे ' सायन्स क्लब'चे दि.२३ सप्टेंबर २०२६ रोजी उद्घाटन करण्यात आले.

या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. रामचंद्र तत्ववादी,जे.डी.आय.ई.टी., यवतमाळ यांच्या हस्ते झाले. आपल्या उद्घाटनाच्या भाषणात डॉ. तत्ववादी यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन, कुतूहल आणि जिज्ञासू वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले, जेणेकरून ते वास्तविक जगातील समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधू शकतील. त्यांनी सायन्स क्लब स्थापन करण्याच्या प्राचार्य डॉ. अजय लाड यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले आणि सांगितले की, अशा व्यासपीठांमुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास आणि सामाजिक प्रगतीत योगदान देण्यास बळ मिळेल.

अध्यक्षीय भाषणात अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी विज्ञान क्लबच्या माध्यमातून यवतमाळ शहरातील जवाहरलाल दर्डा इंग्लिश मीडियम स्कूल, अँग्लो हिंदी हायस्कूल, यवतमाळ पब्लिक स्कूल, वीणा देवी इंटरनॅशनल स्कूल, अणे विद्यालय, विवेकानंद विद्यालय इत्यादी शाळेच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मार्फत विज्ञान विषयाचे ज्ञान देणे, संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील अत्याधुनिक प्रयोग शाळेला भेटी देण्याबाबत व इतर उपक्रमाबाबत नियोजनबद्ध आराखडा मांडला त्यासोबतच विज्ञान विषयाची तंत्रज्ञानासोबत सांगड घालण्यासाठी जेडीआयईटी महाविद्यालयाची मदत घेईल हा सायन्स क्लब प्रदर्शने, स्पर्धा, तज्ज्ञांची व्याख्याने आणि प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, सांघिक कार्य आणि संशोधन वृत्ती जोपासण्यासाठी एक चैतन्यशील व्यासपीठ ठरेल. त्यांनी 'स्कूल कनेक्ट' या उपक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येईल, ज्यामुळे तळागाळापर्यंत वैज्ञानिक जागरूकता पसरण्यास आणि संस्थेची सामाजिक जबाबदारी पूर्ण करण्यास मदत होईल. या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य व रोजगार प्राप्तीसाठी प्रिइंक्युबॅशन सेंटर स्थापनेची घोषणा केली व त्याचे समन्वयक डॉ.अश्विन अतुलवार यांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा उत्साह वाढवला.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. आनंद काकडे यांनी विज्ञान क्लबची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट केली. कार्यक्रमास अँग्लो हिंदी हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजचे प्रतिनिधी श्री. एस. एस. राठोड आणि बापूजी अणे विद्यालयाचे प्रतिनिधी श्री. अमित राजकुंटवार यांची विशेष उपस्थिती लाभली. 'स्कूल कनेक्ट' उपक्रमातील शिक्षकांचा सहभाग हा महाविद्यालय आणि शाळा यांच्यातील दृढ सहकार्याचे प्रतीक ठरला.

या कार्यक्रमास विज्ञान विभाग सत्र प्रमुख डॉ. प्रवीण जोशी, IQAC समन्वयक डॉ. माधुरी भाडे, विज्ञान शाखेतील विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बी.एस्सी. व एम.एस्सी.चे विद्यार्थी उत्साहाने उपस्थित होते. या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे प्रा.यशवंत खंदारे सूत्रसंचालन व प्रा. डॉ. अनघा अनमोड यांनी आभार प्रदर्शन केले.

इंग्रजी विभागातर्फे 'इंग्रजी लिटररी क्लब'चे उद्घाटन



अमोलकचंद महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे विद्यार्थ्यांमध्ये भाषेची आवड आणि साहित्याची अभिरुची निर्माण करण्यासाठी 'इंग्रजी लिटररी क्लब'चे दि.२४ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात इंग्रजी भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून, त्यातून उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होतात, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख वक्ते प्रा. डॉ. मनोज भगत यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी प्रभावी संवाद आणि आधुनिक ज्ञान-विज्ञानाशी जोडले जाण्यासाठी इंग्रजी भाषेची गरज विशद करत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला.

इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश खंडेराव यांनी प्रास्ताविकातून या क्लबच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या विविध साहित्यिक आणि भाषिक उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन प्रा. अभिरुची शेजुडे यांनी केले, तर प्रा. सार्थक ठाकरे यांनी आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यशास्त्र, इतिहास, हिंदी आणि मराठी विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'अभ्यास मंडळाचे' उद्घाटन



स्थानिक अमोलकचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र, इतिहास, हिंदी आणि मराठी विभागांच्या संयुक्त विद्यमाने २६ सप्टेंबर २०२६ रोजी 'अभ्यास मंडळाचे' (Study Board) उद्घाटन आणि विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, वक्तृत्व आणि विषयाचे सखोल ज्ञान विकसित करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम पार पडला.

'भारतीय संविधानात हिंदी व मराठी भाषेची तरतूद व ऐतिहासिक पार्श्वभूमी' या विषयावर प्रमुख वक्ते प्रा. डॉ. प्रवीण शुक्ला यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानातील भाषांचे स्थान, ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि देशाच्या एकात्मतेतील भाषेचे योगदान उलगडून दाखवले. तसेच, श्री. इक्बाल साहिल यांनी कवितेच्या माध्यमातून भाषेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी भाषा आणि राज्यघटना यांचे महत्त्व अधोरेखित करत, भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून संस्कृती आणि अस्मिता जपण्याचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले.

याप्रसंगी अभ्यास मंडळाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. किशोर बुटले यांनी, सूत्रसंचालन हिंदी विभागप्रमुख डॉ. सरिता सिंधी यांनी, तर आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सचिन वानखेडे यांनी केले. या कार्यक्रमाला विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





अमृत - महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय उपक्रमा अंतर्गत शासनाच्या विविध विभागाचे कामकाज कशा पद्धतीने चालते या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व वाणिज्य विभाग विद्यार्थ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयास प्रत्यक्ष भेटीचे आयोजन दि.३० सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले होते . यामध्ये माननीय तहसीलदार आदित्य शेंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.प्रवीण जाधव व कार्यक्रम अधिकारी प्रा. शशिकांत राठोड, डॉ मिता धुर्वे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

MCVC अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची पार्वती ऑटोमोबाईल्स, दर्डा नगर येथे शैक्षणिक भेट





अमोलकचंद कनिष्ठ महाविद्यालयातील एम.सी.व्ही.सी. (ऑटो इंजिनिअरिंग) विभागाच्या अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच दर्डा नगर येथील 'पार्वती ऑटोमोबाईल्स'ला शैक्षणिक भेट दिली.

प्राचार्य डॉ. अजय लाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या भेटीत विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता वाहनांची दुरुस्ती, इंजिनची कार्यप्रणाली, सर्व्हिसिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष (Practical) ज्ञान मिळाले. पार्वती ऑटोमोबाईल्सच्या तज्ज्ञ मेकॅनिक्सनी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शंकांचे निरसन करून त्यांना ऑटोमोबाईल क्षेत्रातील करिअरबाबत मार्गदर्शन केले. या यशस्वी आणि माहितीपूर्ण भेटीसाठी अमोलकचंद महाविद्यालयातर्फे 'पार्वती ऑटोमोबाईल्स'च्या व्यवस्थापनाचे विशेष आभार मानण्यात आले.

विद्यार्थ्यांचे मनोगत

Ishita Santosh Jayasinhpure B.A. Part I



मी एका अगदी छोट्याशा गावातून शहरात शिक्षणासाठी आले आहे. जेव्हा मी पहिल्यांदा अमोलकचंद महाविद्यालयात पाऊल ठेवलं, तेव्हा माझ्या मनात खूप भीती होती. शहरातलं एवढं मोठं कॉलेज, तिथले लोक, नवीन मित्र-मैत्रिणी कसे असतील, मला तिथे जमेल की नाही, असे हजारो प्रश्न माझ्या डोक्यात फिरत होते. पण खरं सांगते, पहिल्याच दिवसापासून इथल्या वातावरणाने मला इतकं आपलंसं केलं की, जणू हे माझं दुसरं घरच आहे, अशी भावना निर्माण झाली. गेल्या काही दिवसांत मी कॉलेजमध्ये खूप मोठे आणि सकारात्मक बदल अनुभवले आहेत. आमचे सर्व क्लासेस आणि प्रॅक्टिकल्स अगदी वेळेवर आणि नियमितपणे होतात. एकही लेक्चर बुडत नाही. आमचे शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन आम्हाला खूप सपोर्ट करतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एक मुलगी म्हणून मला या पूर्ण कॅम्पसमध्ये अत्यंत सुरक्षित वाटतं. इथे जागोजागी बसवलेले CCTV कॅमेरे, सतत सोबत असणारा कर्मचारी वर्ग आणि गेटवरची कडक शिस्त यामुळे मनात कसलीच भीती राहत नाही. आता तर माझे आई-वडीलही माझ्या सुरक्षेबद्दल पूर्णपणे निर्धास्त झाले आहेत. खऱ्या अर्थाने हे कॉलेज माझ्यासाठी विकासाचं आणि सुरक्षेचं एक हक्काचं ठिकाण बनलं आहे.

Pooja Thakre B.Sc. Part II



पूर्ण कॅम्पस खूप स्वच्छ, सुंदर, शिस्तबद्ध आणि चैतन्यमय दिसतो. टाईमटेबलनुसार ठरलेले सगळे लेक्चर्स न चुकता होतात आणि प्रॅक्टिकल्सही अगदी वेळेवर पार पडतात. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे, आमचे प्राध्यापक वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देतात. त्यामुळे अभ्यास करताना काहीही अडचण असली तरी सरांना किंवा मॅडमला विचारायला अजिबात भीती वाटत नाही. मुलींच्या सुरक्षेचा विचार केला, तर हे कॉलेज यवतमाळ शहरातलं सर्वात सेफ ठिकाण आहे, असं मला ठामपणे वाटतं. इथले सिक्युरिटी गार्ड्स आणि संपूर्ण स्टाफ नेहमी अलर्ट असतो. त्यामुळेच आम्ही मुली कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता लायब्ररी आणि लॅबमध्ये तासन् तास बसून अभ्यास करू शकतो. तसंच NSS, स्पोर्ट्स, आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही आम्ही आता अगदी मोकळेपणाने आणि आत्मविश्वासाने भाग घेऊ शकतो. एकंदर इथलं सगळं वातावरणच खूप प्रोत्साहन देणारं आहे. अशा या शिस्तबद्ध आणि सुरक्षित कॉलेजचा एक भाग असल्याचा मला मनापासून खूप अभिमान वाटतो.

Vaibhav Bhandakkar B.Com. Part I



अमोलकचंद महाविद्यालयात ऍडमिशन घेतल्यावर मला खऱ्या अर्थाने समजलं की अभ्यासासोबतच आयुष्यात शिस्तही आपल्या करिअरसाठी आणि भविष्यासाठी किती जास्त महत्त्वाची असते. गेल्या काही दिवसांत आमच्या कॉलेजने शिस्तीच्या आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या बाबतीत खूप मोठे आणि योग्य बदल केले आहेत. आता कॉलेजमध्ये आमचे लेक्चर्स अजिबात बुडत नाहीत किंवा रिकाम्या वेळा वाया जात नाहीत. सगळे प्राध्यापक खूप मनापासून आणि जीव तोडून शिकवतात. सर्वांना मिळणारी अगदी समान वागणूक आणि सगळ्या विद्यार्थ्यांसाठी असलेला अत्यंत सुरक्षित कॅम्पस यामुळे एक विद्यार्थी म्हणून मला इथे शिकताना खूप भारी आणि सुरक्षित वाटतं. आता लायब्ररीमध्ये अभ्यास करायला आणि प्रॅक्टिकल्स करायला मिळणारा वेळ खूप वाढला आहे आणि त्याचा आम्हा सर्वांना खूप जास्त फायदा होतोय. हे कॉलेज खऱ्या अर्थाने आता आमचं दुसरं घर झालंय, जिथे आम्ही दररोज काहीतरी नवीन गोष्टी शिकत आहोत आणि स्वतःला घडवत आहोत.

Shweta Ambade M.A. Part I



अमोलकचंद महाविद्यालय हे माझ्यासाठी फक्त एक कॉलेज किंवा डिग्री मिळवण्याचं ठिकाण राहिलं नाही, तर ते आता खऱ्या अर्थाने माझं दुसरं घरच बनलं आहे. जेव्हा मी पहिल्यांदा या कॅम्पसमध्ये पाऊल ठेवलं, तेव्हा मनात थोडी धाकधूक होती, पण इथलं वातावरण इतकं मोकळं, सकारात्मक आणि स्वागतशील वाटलं की, क्लास संपल्यावरही तिथेच कट्ट्यावर किंवा लायब्ररीत वेळ घालवावासा वाटतो.सर्व फॅकल्टीचे आमचे सगळे शिक्षक आम्हाला प्रत्येक पावलावर खूप सपोर्ट करतात. त्यांचा दृष्टिकोन खूप वेगळा आहे. ते फक्त पुस्तकातून शिकवत नाहीत किंवा कसातरी सिलॅबस पूर्ण करण्यावरच अडकून राहत नाहीत, तर आम्हाला आजूबाजूच्या जगाचा स्वतःचा विचार करायला आणि आमचं मत कोणत्याही दबावाशिवाय न घाबरता मांडायला शिकवतात. मला सर्वात जास्त भावलेली आणि महत्त्वाची वाटणारी गोष्ट म्हणजे, वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याला विषय समजावा यासाठी शिक्षकांची असलेली तळमळ आणि धडपड. एखादा कठीण विषय किंवा संकल्पना असेल, तर सर ती अगदी सोपी करून मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांमध्ये समजावून सांगतात. त्यांच्या या प्रयत्नांमुळे वर्गातल्या एकाही विद्यार्थ्याला तो विषय अवघड वाटत नाही, आणि आपणही या प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग आहोत याची जाणीव प्रत्येकाला होते.

बातमी कात्रणे

लोकमत

'अमोलकचंद'च्या विद्यार्थ्यांच्या संशोधनाला पेटंट

लोकमत न्यूज नेटवर्क



यवतमाळ : येथील अमोलकचंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधनाला पेटंट प्राप्त झाले आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय "कॅबिनेट ऑफ इलेक्ट्रोड फॉर इलेक्ट्रो केमिकल ॲनॉलिसिस" असा होता. तैभवी गौडे, आचल पवार, तेजस बेले यांनी प्रा. डॉ. अमृत गुणवंतराव गहूमवार आणि डॉ. ओमकार कापसे यांच्या मार्गदर्शनात हे संशोधन पूर्ण केले आहे.

सत्र २०२४-२०२५ मध्ये रसायनशास्त्र विषयात एम.एससी. करत असताना या विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास करून प्रोजेक्ट पूर्ण केला. यानंतर भारतीय बौद्धिक संपदा हक्कासाठी (पेटंट) त्यांनी बौद्धिक संपदा हक्क भवन, मुंबई येथे सादर केला. यावर्षी म्हणजेच जून २०२६ मध्ये त्यांना पेटंट प्रदान करण्यात आले आहे.

कुठल्याही द्रावणाच्या विश्लेषणासाठी अधिक प्रमाणात द्रावण लागते. या विद्यार्थ्यांनी विश्लेषणासाठी द्रावण कमी करले लागू शकते हे त्यांच्या संशोधनातून सिध्द केले आहे. या प्रयोगामुळे जगात लागणाऱ्या कोटयवधी रुपयांच्या द्रावणाची बचत होऊ शकते, विश्लेषण अचूक करण्यास मदत आणि एकाच वेळेत द्रावणाचे विश्लेषण पारखून पाहता येते किंवा माहितीची खाजी करता येते, असे या संशोधनातून मांडण्यात आले आहे. याचा लाभ केमिस्ट व प्रयोगशाळेत काम करणाऱ्या संशोधकांना होणार आहे. प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. टी.पी. चव्हाण यांच्यासह विद्यार्थी व प्राध्यापकांचा गौरव केला. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. विजय दर्डा, सचिव सीए प्रकाश चोपडा यांनी विद्यार्थी व प्राध्यापकांचे या यशाबद्दल कौतुक केले.

Hello Yavatmal
Page No. 2 Jul 14, 2026
Powered by: erelego.com


अमोलकचंद महाविद्यालयात ए.इ.डी.पी.अंतर्गत

बीकॉम रोजगारभिमुख अभ्यासक्रम सुरू

रामभाऊ भोयर

यवतमाळ प्रतिनिधी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांच्या रोजगारभिमुख शिक्षण प्रणाली या संकल्पनेतून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ सलग्नित अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ येथे सत्र 2026-27 पासून बी. कॉम. या विषयात अप्रेंटीसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम हा अभ्यासक्रम विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांनी सुरू करण्याची मान्यता प्रदान केली केली असून अमोलकचंद महाविद्यालयात विद्यार्थ्यां साठी रोजगारभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य असे आहे की विद्यार्थ्यांना सहाव्या सेमिस्टर मध्ये औद्योगिक किंवा विषयाच्या सलंगित कंपनीमध्ये सहा महिने अप्रेंटीसशिप करावी लागेल व त्या विद्यार्थ्यांना बोर्ड ऑफ अप्रेंटीसशिप ट्रेनिंग(बोट) या केंद्रीय संस्थेमार्फत आठ ते दहा हजारापर्यंत दर महिन्यात स्टायपेंड मिळणार आहे या विषयासाठी महाविद्यालयाने यवतमाळतील नामांकित कंपनी व औद्योगिक क्षेत्रांमध्ये कार्यरत फर्म सोबत सामंजस्य करार सुद्धा केलेला आहे. वाणिज्य विषयांमध्ये बारावी पास विद्यार्थ्यांना बीकॉम प्रथम वर्षात लवकरात लवकर प्रवेश घ्यावा असे आवाहन अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी केले असून प्रवेशा संबंधी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.प्रविण जाधव यांच्याशी संपर्क साधावा असे कळविले आहे



पुण्य नगरी

अमोलकचंद महाविद्यालयात युवा कार्य प्रशिक्षण कार्यशाळा



यवतमाळ : येथील अमोलकचंद महाविद्यालयाच्या वतीने १३ जुलै रोजी महाविद्यालयाच्या संयोजक विभागाच्या वतीने जागतिक युवा कौशल्यदिनाच्या अनुषंगाने जिल्हा कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड, प्रमुख वक्ते जिल्हा रोजगार व उद्योजगता विभागाचे साहाय्यक आयुक्त सुशील उचले यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक विभाग प्रमुख कौशल्य विकास डॉ. अनुप भट यांनी केले. सहाय्यक आयुक्त सुशील उचले यांनी शासनाचे विद्यावेतनावर आधारित मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेबाबत तसेच रोजगार मेळाव्याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी विद्यार्थ्यांना कौशल्य आत्मसात करून नवीन येणाऱ्या संधींबाबत तसेच प्रशिक्षण योजनेंतर्गत महाविद्यालयातील उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांनी नोंदणी क्यू आर कोडरच्या माध्यमातून करण्यात आले. कार्यशाळेसाठी विविध शाखेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांची नोंदणी करून शासनाच्या संबंधित पोर्टलवर विविध योजनेसाठी नोंदणी करून घेण्यात आली. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याची पद्धत व मुलाखत कौशल्य याबाबत मार्गदर्शन डॉ सविता अग्नीहोत्री , डॉ मिता धुर्वे, योगेश बेंडे यांनी केले. संचालन डॉ.अनुप भट यांनी केले तर आभार डॉ. आनंद काकडे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

Yavatmal Edition
Jul 17, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

लोकमत

मस्ट READ

'अमोलकचंद'मध्ये अत्याधुनिक रसायनशास्त्र प्रयोगशाळा

नूतनीकरण झालेल्या वास्तूचे थाटात उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क



यवतमाळ : येथील अमोलकचंद महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या नूतनीकरण झालेल्या अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. विजय दर्डा यांच्या संकल्पनेनुसार विद्यार्थ्यांना आधुनिक प्रयोगशाळेच्या सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या प्रायोगिक ज्ञानाला चालना देणे, प्रयोगशीलतेला प्रोत्साहन तसेच त्यांच्यात संशोधनवृत्ती विकसित करणे, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे यावेळी स्पष्टीकरण.

विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक ज्ञानाला चालना, प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आला उपक्रम

उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे सचिव चार्टर्ड अकाऊंटंट प्रकाश चोपडा होते. प्रमुख पाहुणे म्हणून मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. प्रवीण जाणी, सहसचिव ॲड. महेंद्र ओसवाल, सदस्य ॲड. मनश, प्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. लाड, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. टी. पी. चव्हाण, सेवानिवृत्त प्रा. ए. एस. अट्टालकर, प्रा. सी. बी. देशपांडे, प्रा. एस. एस. काबरा, डॉ. जी. बी. पाचाडे, प्रयोगशाळा कर्मचारी आर. एन. टाके, एस. जी. तराडे आदी होते.

अध्यक्षीय भाषणात प्रकाश चोपडा म्हणाले, विद्यार्थ्यांनी उपलब्ध आधुनिक सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून आपल्या ज्ञानसोबतच प्रायोगिक कौशल्य आणि संशोधनवृत्ती विकसित करावी. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून प्रयोगाधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रास्ताविकातून प्रा. डॉ. टी. पी. चव्हाण यांनी रसायनशास्त्र विषयाच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत प्रयोगशाळेचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट केले. संचालन प्रा. डाय. व्ही. खंदारे यांनी केले. आभार डॉ. ए. व्ही. कावलकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. माधुरी भादे, डॉ. सुचिता वानखेडे, विभागातील प्राध्यापक, तसेच शिक्षकेतर कर्मचारी गोलहर, शर्मा, हेडाऊ, सागर ठाकूर आदींनी पुढाकार घेतला.

विद्यार्थी, प्राध्यापकांचा सन्मानचिन्ह देवून गौरव

या महाविद्यालयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थी आचल पवार, तैभवी गौडे, तेजस बेले यांना प्रा. डॉ. अमृत गहूमवार आणि प्रा. ओंकार कापसे यांच्या मार्गदर्शनात "कॅबिनेट ऑफ इलेक्ट्रोड फॉर इलेक्ट्रोकेमिकल ॲनालिसिस" या विषयावर भारतीय बौद्धिक संपदा हक्कांतर्गत पेटंट प्राप्त झाले. याबद्दल सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. प्रयोगशाळा नूतनीकरणाच्या कार्यात उल्लेखनीय पुढाकार घेतल्याबद्दल प्रा. डॉ. प्रशांत मुसकावार यांचा सत्कार करण्यात आला.

Hello Yavatmal
Page No. 2 Sep 17, 2026
Powered by: erelego.com

दैनिक युवाराष्ट्र दर्शन

बेरोजगार युवकांचा मार्गदाता

२२/०९/२०२६

अमोलकचंद महाविद्यालयातील खेळाडूंना वुशूमध्ये सुवर्णपदक व रजतपदक

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

यवतमाळ दि. २१



क्रीडा व सेवा संचनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती, वुशू असोसिएशन ऑफ अमरावती डिस्ट्रिक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमरावती विभागीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धा (२०२६-२७) १९ वर्षाखालील मुलें मध्ये (९० किलो खालील) वजन गटामध्ये अमोलकचंद महाविद्यालयातील खेळाडू आदर्श प्रदीप जाधव यांनी प्रथम क्रमांक सुवर्णपदक प्राप्त केले. संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय वुशु क्रीडा स्पर्धेत अमरावती विभागाचे नेतृत्व करणार. तसेच कु. रिधिमा देशमुख हिने यवतमाळ जिल्ह्याचे नेतृत्व करत असतांना (६५ किलो खालील) वजन गटामध्ये द्वितीय क्रमांक सिल्वर मेडल प्राप्त केल्याबद्दल दोन्ही खेळाडूंची यशाबद्दल विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष अध्यक्ष डॉ. विजय दर्डा व सचिव सी.ए.प्रकाश चोपडा व कार्यकारिणी सर्व पदाधिकारी सदस्यांनी अभिनंदन केले आहे. तसेच या खेळाडूंचे अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय लाड पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले यावेळी शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. किशोर तायडे व क्रीडा शिक्षक प्रा. संजय पंदिरवाड उपस्थित होते. त्यांच्या यशाबद्दल सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

स्वदेश

दि. १४/७/२०२६ २

अमोलकचंद महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा



यवतमाळ : येथील स्थानिक अमोलकचंद महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिनउत्साहात साजरा करण्यात आला. याहून लोकसंख्येचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम आणि त्यावरील उपाययोजना याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड होते, तर प्रमुख वक्ते म्हणून इंदिरा महाविद्यालय कळंब येथील अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. अजय लालपलेवार हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोलकचंद महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मेटे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी जागतिक लोकसंख्या दिनाचे ऐतिहासिक महत्त्व, त्याचबरोबर लोकसंख्या आणि शाश्वत विकास यांचे महत्त्व विशद केले.

यानंतर प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अजय लालपलेवार यांनी लोकसंख्या ही देशाची शक्ती बनू शकते, जर आपण तरुणांना योग्य शिक्षण आणि कौशल्ये दिले. परंतु अन्यथा तो लोकसंख्या आणि शाश्वत विकास यांच्या मार्गातील मोठा अडथळा ठरू शकतो, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात बालाजना प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक म्हणून समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी सामाजिक समतेसाठी विद्यार्थी व समाजाने उपस्थितांना झुमी लहान कुटुंब पुरस्कार करा, मुला-मुलींना - दर्जा आणि देशाच्या विकासात - लाखातून अशा प्रकारची शपथ दिली.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा राजी खासदार डॉ. विजय दर्डा, उपाध्यक्ष डॉ. ललित निगडिया, सचिव सी.ए. प्रकाशजी चोपडा व संचालक मंडळ यांनी जागतिक लोकसंख्या दिनाच्या विद्यार्थी, पालक व सर्व प्राध्यापक यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश बंडे यांनी केले आणि उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. अमोल चंद्रनखेडे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमोलकचंद महाविद्यालयात जिल्हास्तरीय राष्ट्रीय सेवा योजना निवड चाचणी शिबिर संपन्न

प्रतिनिधी / अमरावती दर्शन



यवतमाळ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये जिल्ह्यांमधील विविध महाविद्यालयांमधून आलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. याशिबिराचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांच्या हस्ते झाले, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अशा प्रकारचे शिबिर अत्यंत आवश्यक असतात ,विद्यार्थी येथूनच घडत असतो असे आपल्या संबोधनातून व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड होते , राष्ट्रीय सेवा योजनेच्या जिल्हा समन्वयक डॉ. निलिमा दवणे यांनी कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक केले , तसेच क्षेत्रीय समन्वयक प्रा. सचिन वानखेडे हे कार्यक्रमाला उपस्थित होते. या शिबिरात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व तसेच राज्यस्तरीय गणतंत्र पथ संचलन, अहमदाबाद २०२६ , राष्ट्रीय व राज्यस्तरीय साहसी शिबिर राष्ट्रीय एकात्मता शिबिर, राष्ट्रीय युवा उत्सव, उत्कर्ष व प्रेरणा शिबिर साठी विविध चाचण्या घेण्यात आल्या.

सांस्कृतिक कार्यक्रमांचे परीक्षक म्हणून डॉ. मनोज जोशी आणि डॉ.चंद्रशेखर कुटमेते यांनी काम पाहिले, तर शारीरिक चाचण्यांचे परीक्षण डॉ.शुभम कदम आणि प्रा.भोतन देवरे यांनी केले, तर कार्यक्रमाचे संचालन डॉ.रुपेश मुरेलवार यांनी केले व आभार प्रा.शशिकांत राठोड यांनी मानले.या शिबिरात यवतमाळ जिल्ह्यातील महाविद्यालयातीन विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला, त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

दैनिक सिंहझेप १८ सप्टेंबर २०२६



अमोलकचंद महाविद्यालयाकडून खेळाडूंना प्रोत्साहन

यवतमाळ

•दै. सिंहझेप

शालेय साँफ्टबॉल खेळाडूंना सरावासाठी सुविधा उपलब्ध करून देत अमोलकचंद महाविद्यालयाने सामाजिक दायित्वाची जाणीव जपली. महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने शालेय खेळाडूंना महाविद्यालयाचे साँफ्टबॉल मैदान सरावासाठी उपलब्ध करून देण्यात आले. तसेच साँफ्टबॉल कॅचर किटसह आवश्यक साहित्य भेट देण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांच्या हस्ते खेळाडूंना साहित्य प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांनी खेळाडूंशी संवाद साधत आगामी स्पर्धांसाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. मेहनत, सातत्य आणि शिस्तीच्या जोरावर यश संपादन करण्याचा संदेश देत त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमासाठी शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. किशोर तायडे, संजय पंदिरवाड तसेच महाविद्यालयातील साँफ्टबॉल खेळाडूंचे सहकार्य लाभले. साहित्य स्वीकारताना खेळाडूंचे प्रशिक्षक तथा आंतरराष्ट्रीय साँफ्टबॉल खेळाडू भाकित मेश्राम, पियुष चांदेकर व पंकज शिरोडकर यांनी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा, सचिव सीए प्रकाश चोपडा आणि अमोलकचंद महाविद्यालय परिवाराचे आभार मानले. महाविद्यालयाच्या या उपक्रमामुळे शालेय खेळाडूंना दर्जेदार सरावाची सुविधा मिळून त्यांच्या क्रीडा विकासाला चालना मिळणार आहे.

अमोलकचंद महाविद्यालयाच्या खेळाडूंचे वर्चस्व

लोकमत न्यूज नेटवर्क



यवतमाळ : क्रीडा व सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, यवतमाळ जिल्हास्तरीय विविध स्पर्धा २२ व २३ सप्टेंबर दरम्यान पार पडल्या. या स्पर्धेत अमोलकचंद महाविद्यालयातील खेळाडूंनी वर्चस्व राखले, स्पर्धेतील खेळाडूंची निवड विभागीय व राज्यस्तरीयसाठी झाली.

२ खेळाडूंची राज्यस्तरीयसाठी निवड झाली

रायफल व पिस्तूल शूटिंगमध्ये स्मीत वांद्रेकर, अनिरुद्ध शिवपुरीया, मयंक लेवस्कर, सुमित पाटील, संजीव पाटील, महंमद ताहीर तंवर, गौरी वांद्रेकर, प्रिया भुरे, वैष्णवी केसकर यांनी आपापल्या इव्हेंटमध्ये प्रथम क्रमांक पटकावून विभाग स्तरासाठी निवड निश्चित केली. बुद्धिबळ स्पर्धेमध्ये हर्षिता कुचेरिया द्वितीय क्रमांक प्राप्त करून विभाग स्तरासाठी, जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावून विभाग स्तरासाठी निवड निश्चित केली. विभागीय स्तरावर रग्बी या खेळात सेलेक्शन ट्रायल सुमित पाटील, संजीव पाटील या दोन खेळाडूंची राज्यस्तरासाठी निवड झाली. खेळाडूंचे विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा, सचिव सीए प्रकाश चोपडा, कार्यकारिणी सदस्यांनी कौतुक केले. खेळाडूंना प्राचार्य डॉ. अजय लाड, उपप्राचार्य व्ही. सी. जाधव, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. किशोर तायडे, क्रीडा शिक्षक प्रा. संजय पंदिरवाड व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

इंग्रजी भाषेच्या ज्ञानातून विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या संधींचे विस्तृत दालन : डॉ. अजय लाड



पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी

यवतमाळ : यवतमाळ विद्या प्रसारक मंडळाद्वारा संचालित अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील इंग्रजी (पदवी व पदव्युत्तर पदवी) विभागाच्या वतीने इंग्रजी लिटररी क्लब याअभ्यास मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेची आवड निर्माण करणे, साहित्याची अभिरुची विकसित करणे तसेच इंग्रजी विषयाच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक व व्यावसायिक संधींची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड होते, तर प्रा. डॉ. मनोज भगत हे कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश खंडेराव यांचीही प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख वक्ते प्रा. डॉ. मनोज भगत यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून इंग्रजी भाषेचे आजच्या युगातील महत्त्व अधोरेखित केले. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर इंग्रजी भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून, उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, संशोधन, अध्यापन, अनुवाद, पत्रकारिता, माहिती-तंत्रज्ञान तसेच विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये इंग्रजीच्या माध्यमातून करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचा केवळ अभ्यासक्रमापुरता विचार न करता तिचा प्रभावी संवादासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी इंग्रजी भाषेची सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील गरज स्पष्ट केली. सार्वजनिक जीवनात प्रभावी संवाद साधण्यासाठी तसेच आधुनिक ज्ञान-विज्ञानाच्या विविध क्षेत्रांशी जोडले जाण्यासाठी इंग्रजी भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरते, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी भाषेचे अधिकाधिक ज्ञान आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती समाजाची संस्कृती, परंपरा आणि अस्मिता जपण्याचे महत्त्वपूर्ण साधन आहे, असेही त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले. इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश खंडेराव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. इंग्रजी लिटररी क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि भाषिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार असून, त्यांच्या वाचन, लेखन, वक्तृत्व आणि सादरीकरणाच्या कौशल्यांना चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा अभ्यासपूरक उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा. डॉ. गणेश खंडेराव लिखित "Manncynnes Heorte - The Heart of Humanity" या काव्य पुस्तकाचे विमोचन करण्यात आले, या प्रसंगी प्राचार्य डॉ. अजय लाड, डॉ.जाधव, डॉ. मेटे, प्रा. वानखेडे, डॉ. भगत, डॉ. बुटले, प्रा. तायडे, प्रा. राठोड, प्रा. धारणे, आणि प्रा. ठाकरे हे उपस्थित होते. सोबतच या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विविध विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषा व साहित्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी इंग्रजी लिटररी क्लब महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. संचालन प्रा. अभिरुची सेजोडे यांनी केले तर आभार प्राध्यापक सार्थक ठाकरे यांनी मानले.

अमोलकचंद महाविद्यालयात राज्यशास्त्र, इतिहास, हिंदी व मराठी अभ्यास मंडळ उद्घाटन कार्यक्रम



प्रतिनिधी / अमरावती दर्शन

यवतमाळ, २८ सप्टेंबर : विद्या प्रसारक मंडळद्वारा संचालित, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळयेथील राज्यशास्त्र विभाग, इतिहास विभाग, हिंदी विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमानेअभ्यासमंडळउद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय लाड व कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. प्रवीण शुक्ला, श्री. इक्बाल साहिल, डॉ. गणेशखंडेराव, मराठी विभाग प्रमुख डॉ. किशोर बुटले, इतिहास विभाग प्रमुख प्रा. सुलोचना लांजेवार, हिंदी विभाग प्रमुख डॉ. सरिता सिंधी ,राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.सचिन वानखेडे मंचावर उपस्थित होते. सर्व प्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठाच्या गीताने झाली. उद्घाटक व प्रमुख वक्ते प्रा. डॉ.प्रवीण शुक्ला यांनी भारतीय संविधानात हिंदी व मराठी भाषेची वस्तुत व ऐतिहासिक पार्श्वभूमी या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की,भारतीय संविधानात विविध भाषांना मिळालेले स्थान, विशेषत: हिंदी व मराठी भाषेविषयी करण्यात आलेल्या संवैधानिक तरतुदी आणि त्यामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी उलगडून दाखवली. देशाची एकात्मता आणि सांस्कृतिक जडणघडणीत भाषांचे योगदान अनमोल असल्याचे सांगितले. तसेच हिंदी कविता व श्लोक सादर करून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये मनोरंजनात्मक वातावरण निर्माण केले. तसेच श्री.इक्बाल साहिल यांनी हिंदी कवितेच्या माध्यमातून भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी राजभाषा हिंदी आणि मातृभाषा मराठी भाषेची भारतीय संविधानात केलेली तरतूद ही अभ्यासाच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वाची आहे. भाषेचे अधिक ज्ञान असणे,हे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी मोलाचे असते अशा शब्दात विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी अभ्यास मंडळात असणाऱ्या सदस्यांचे, विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत व अभिनंदन करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राज्यशास्त्र, इतिहास, हिंदी व मराठी विभागातील प्रमुख, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख किशोर बुटले, तर कार्यक्रमाचे संचालन हिंदी विभाग प्रमुख उर्वरित पेज २ वर

अमोलकचंद महाविद्यालयात ...

प्रमुख सरिता सिंधी यांनी केले व राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.सचिन वानखेडे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

लोकमत समाचार

अमोलकचंद के खिलाड़ियों ने मारी बाजी



संभागीय तथा राज्य स्तर पर चयनित अमोलकचंद महाविद्यालय के खिलाड़ी.

यवतमाल : जिला क्रीड़ा अधिकारी कार्यालय की ओर से आयोजित जिला स्तरीय विभिन्न क्रीड़ा प्रतियोगिताओं में अमोलकचंद महाविद्यालय के छात्रों ने शानदार प्रदर्शन किया. राइफल व पिस्तौल शूटिंग में स्मित वांद्रेकर, अनिरुद्ध शिवपुरिया, मयंक लेवस्कर, सुमित पाटिल, संजीव पाटिल एवं मोहम्मद ताहिर तंवर ने अपने-अपने इवेंट में प्रथम स्थान हासिल कर संभागीय स्तर के लिए चयन प्राप्त किया. वहीं छात्राओं में गौरी वांद्रेकर, प्रिया भुरे एवं वैष्णवी केसकर ने भी प्रथम स्थान हासिल किया. शतरंज में हर्षिता कुचेरिया ने द्वितीय स्थान प्राप्त किया. वहीं, वास्केटबॉल प्रतियोगिता में महाविद्यालय की पुरुष टीम ने प्रथम स्थान हासिल किया. रग्बी की संभागीय चयन ट्रायल में सुमित पाटिल व संजीव पाटिल का राज्य स्तर के लिए चयन हुआ. खिलाड़ियों की सफलता पर अध्यक्ष डॉ. विजय दर्डा, सचिव सी.ए. प्रकाश चोपड़ा, प्राचार्य डॉ. अजय लाड समेत प्राध्यापकों एवं कर्मचारियों ने सराहना की.

मान्यवर व कर्मचाऱ्यांनी रानभाज्यांची खरेदी केली. आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून कल. | हरिभाऊ निमकर पुढील तपास करीत आहे.

अमोलकचंद महाविद्यालय, सायन्स क्लबच्या माध्यमातून स्कूल कनेक्ट नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणार

प्रतिनिधी / अमरावती दर्शन

यवतमाळ, २६ सप्टेंबर : अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील श्री. वसंतराव नाईक सभागृहात विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. विजय दर्डा यांच्या शिक्षण प्रणाली संकल्पनेतून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतर्फे सायन्स क्लबचे उद्घाटन करण्यात आले. या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. रामचंद्र तत्त्ववादी, जे.डी.आय.ई.टी., यवतमाळ यांच्या हस्ते झाले. आपल्या उद्घाटनाच्या भाषणात डॉ. तत्त्ववादी यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन, कुतूहल आणि जिज्ञासू वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले, जेणेकरून ते वास्तविक जगातील समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधू शकतील. त्यांनी सायन्स क्लब स्थापन करण्याचा प्रारंभ डॉ. अजय लाड यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले आणि सांगितले की, असा व्यासपीठांमुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास आणि सामाजिक



प्रगतीत योगदान देण्यास बळ मिळेल. अध्यक्षीय भाषणात अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी विज्ञान क्लबच्या माध्यमातून यवतमाळ शहरातील जवाहरलाल दर्डा मीडियम स्कूल, ॲग्लो हिंदी हायस्कूल, यवतमाळ पब्लिक स्कूल, यीणा देवी इंटरनॅशनल स्कूल, अणे विद्यालय, विवेकानंद विद्यालय इत्यादी शाळेच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मार्फत विज्ञान विषयाचे ज्ञान देणे, संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील अत्याधुनिक प्रयोगशाळेला भेटी देण्याबाबत व इतर उपक्रमाबाबत नियोजनबद्ध आराखडा मांडला त्यासोबतच विज्ञान विषयाची तंत्रज्ञानासोबत सांगड घालण्यासाठी जेडीआयईटी महाविद्यालयाची मदत घेईल हा सायन्स क्लब प्रदर्शने, स्पर्धा, तज्ज्ञांची व्याख्याने आणि प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, सांघिक कार्य आणि संशोधन वृत्ती जोपासण्यासाठी एक पेठऱ्यशील व्यासपीठ ठरेल.

त्यांनी स्कूल कनेक्ट या उपक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येईल, ज्यामुळे तळागाळापर्यंत वैज्ञानिक जागरूकता पसरण्यास आणि संस्थेची सामाजिक जबाबदारी पूर्ण करण्यास मदत होईल, या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य व रोजगार प्राप्तीसाठी प्रिंट्रेन्युबेशन सेंटर स्थापनेची घोषणा केली व त्याचे समन्वयक डॉ.अश्विन अतुलकार यांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. आनंद काकडे यांनी विज्ञान क्लबची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट केली.

कार्यक्रमास ॲग्लो हिंदी हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजचे प्रतिनिधी श्री. एस. एस. राठोड आणि बापूजी अणे विद्यालयाचे प्रतिनिधी श्री. अमित राजकुंटवार यांची विशेष उपस्थिती लाभली. स्कूल कनेक्ट उपक्रमातील शिक्षकांचा सहभाग हा महाविद्यालय आणि शाळा यांच्यातील दृढ सहकार्याचे प्रतीक ठरला. या कार्यक्रमास विज्ञान विभाग सत्र प्रमुख डॉ. प्रवीण जोशी, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. माधुरी भाडे, विज्ञान शाखेतील विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बी.एस्सी. व एम.एस्सी.चे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यशवंत खंदारे यांनी तर आभार प्रा. डॉ. अनघा अनमोड यांनी मानले.

लोकमत

अमोलकचंद महाविद्यालयात 'सायन्स क्लब'

लोकमत न्यूज नेटवर्क

यवतमाळ : येथील अमोलकचंद महाविद्यालयात विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. विजय दर्डा यांच्या शिक्षण प्रणाली संकल्पनेतून विज्ञान शाखेतर्फे 'सायन्स क्लब'ची स्थापना करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या वसंतराव नाईक सभागृहात येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामचंद्र तत्त्ववादी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड होते.

विज्ञान क्लबच्या माध्यमातून यवतमाळ शहरातील जवाहरलाल दर्डा इंग्लिश मीडियम स्कूल, ॲग्लो हिंदी हायस्कूल, यवतमाळ पब्लिक स्कूल, वीणादेवी दर्डा शाळा, अणे विद्यालय, विवेकानंद विद्यालय आदी शाळांच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत विज्ञान विषयाचे ज्ञान दिले जाणार आहे. विज्ञान विषयाची तंत्रज्ञानासोबत सांगड घालण्यासाठी जेडीआयईटीची मदत घेतली जाईल. सायन्स क्लब प्रदर्शन, स्पर्धा, तज्ज्ञांची व्याख्याने आणि प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, सांघिक कार्य आणि संशोधन वृत्ती जोपासण्यासाठी 'स्कूल कनेक्ट' उपक्रम एक व्यासपीठ ठरेल, असे यावेळी सांगण्यात आले.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य व रोजगार प्राप्तीसाठी प्रिंट्रेन्युबेशन सेंटर स्थापनेची घोषणा करण्यात आली. त्याचे समन्वयक डॉ अश्विन अतुकुलवार यांचे यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. आनंद काकडे यांनी विज्ञान क्लबची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट केली.

कार्यक्रमाला एस. एस. राठोड अमित राजकुंटवार तसेच विज्ञान विभाग सत्र प्रमुख डॉ. प्रवीण जोशी आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. माधुरी भाडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यशवंत खंदारे यांनी तर आभार प्रा. डॉ. अनघा अनमोड यांनी मानले.

dainikloknayak@gmail.com

बीड | जालना | औरंगाबाद येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

महाराष्ट्राचा महानायक

लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

दिनांक 29 सप्टेंबर 2026 मंगळवार

अमोलकचंद महाविद्यालयाच्या मुले व मुलींच्या संघाने पटकावला तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक!



यवतमाळ : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, यवतमाळ आणि तालुका क्रीडा संयोजक यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात पार पडली. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत १२ वर्षाखालील मुलांच्या अमोलकचंद महाविद्यालयाच्या मुले व मुली या दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तालुकास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला आहे.

विजेत्या संघांचा गौरव व सत्कार :

अमोलकचंद महाविद्यालयाच्या दोन्ही संघांनी मिळवलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, सचिव व प्रशस्तीपत्रे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. किशोर तायडे, क्रीडा शिक्षक प्रा. संजय पंडितवाड, समस्त प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंना पुढील वाटचालीस विजयश्रीच्या शुभेच्छा देत त्यांचे अभिनंदन केले आहे.

क्रीडाप्रेमीकडून अभिनंदनाचा वर्षाव :

या शानदार यशाबद्दल यवतमाळ शहरातील समस्त क्रीडाप्रेमींनीही दोन्ही संघांवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. अमोलकचंद महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दाखवलेल्या या उत्तम कामगिरीमुळे महाविद्यालयासह संपूर्ण तालुक्याचा मान वैशिक वाढला असून, पुढील जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

अमोलकचंद महाविद्यालयात 'विद्यार्थी अभिमुखता' कार्यक्रम संपन्न

नवीन शैक्षणिक प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अमोलकचंद महाविद्यालयात तीन दिवसीय 'विद्यार्थी अभिमुखता' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचा इतिहास आणि पायाभूत सुविधा दर्शविणाऱ्या माहितीपूर्ण चित्रफितीने झाला, त्यानंतर विद्या प्रसारक मंडळ यवतमाळ चे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा आणि सचिव सीए श्री प्रकाश चोपडा यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या श्री.वसंतराव नाईक सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. 'विद्यार्थी मित्रांनो रोजगाराभिमुख शिक्षण घ्या' - असा सल्ला व उद्योजकतेबद्दल मार्गदर्शन प्रमुख पाहुणे श्री राजेश्वर निवल यांनी केले. 'आजच्या स्पर्धेच्या युगात आत्मनिर्भर होणे काळाची गरज आहे, असे विचार आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी मांडले व विद्यार्थ्यांचे मनः पूर्वक स्वागत केले. कार्यक्रमांतर्गत झालेल्या बौद्धिक सत्रांमध्ये डॉ. सरोज कुंभारे, डॉ. नंदकुमार मेटे आणि डॉ. मिता धुर्वे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग म्हणून NSS, NCC, परीक्षा विभाग, ग्रंथालय, जिमखाना आणि क्रीडा विभागाच्या प्रमुखांनी आपापल्या विभागांची कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा यांची माहिती दिली. दुसऱ्या दिवशी व्यक्तिमत्व विकास, प्रभावी अध्ययन पद्धती, वेळेचे नियोजन, मूलाग्रह कौशल्य आणि संवाद कौशल्य यावर तज्ज्ञ प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले



उपस्थित मान्यवर राजेश्वर निवल, प्राचार्य डॉ. अजय लाड, डॉ. माधुरी भाडे, डॉ. प्रवीण जोशी, डॉ. गणेश खंडेराव.

अमोलकचंद महाविद्यालयात नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत अभिनव उपक्रम संपन्न

आई-वडिलांचे संस्कार जपा व नशा मुक्त रहा: प्राचार्य डॉ. अजय लाड यांचे प्रतिपादन

दिनांक २३ सप्टेंबर २०२६

(दै. यवतमाळ वाणी)

कार्यालय प्रतिनिधी

यवतमाळ - युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय भारत सरकार द्वारा नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत या विषयावर अमोलकचंद महाविद्यालय,यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री अनिरुद्ध बक्षी निवासी उपजिल्हाधिकारी, यवतमाळ उपस्थित राहणार होते व तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सचिन वानखडे व अध्यक्ष म्हणून अमोलकचंद



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड उपस्थित होते.

संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदे मातरम गीता सह कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन कार्यक्रम अधिकारी प्रा. शशिकांत राठोड यांनी प्रास्ताविकात संबंधित उपक्रमाची रूपरेखा मांडली विद्यार्थ्यांनी नशा मुक्त आधारित नाटकाचे सादरीकरण केले. अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य

डॉ. अजय लाड यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या शिक्षणासोबत आई-वडिलांचे संस्कार जपा व नशा मुक्त रहा असे संदेश देऊन विद्यार्थ्यांना नशा मुक्त राहण्याची शपथ दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नशा मुक्त अभियानाच्या स्वाक्षरी मोहीम राबवून आम्ही नशा करणार नाही तसेच युवकाला वाचासून दूर ठेवू असा निर्धार केला.

कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुचिता वानखडे तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रुपेश मुरलवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. सरिता सिंधी, प्रा.योगेश बेंडे व तसेच राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

अमोलकचंद महाविद्यालयात 'विकसित भारतासाठी नशामुक्त युवक' विषयावर विशेष व्याख्यान

प्रतिनिधी / अमरावती दर्शन

यवतमाळ, १८ ऑगस्ट : स्थानिक अमोलकचंद महाविद्यालयात 'विकसित भारतासाठी नशामुक्त युवक' या महत्त्वपूर्ण विषयावर विशेष व्याख्यान आणि स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय लाड होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मिलिंद गजभिये उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ. मिलिंद गजभिये यांनी युवा शक्तीचे महत्त्व अधोरेखित करत अंगीकार करण्याचे आवाहन केले. युवकांनी नशामुक्त जीवन जगून राष्ट्र उभारणीच्या कार्यात सक्रिय योगदान दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.



अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. अजय लाड यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनशैलीचा व्यसनमुक्तीबाबत सखोल मार्गदर्शन केले. कोणत्याही देशाचे भविष्य त्या देशातील युवा शक्तीवर अवलंबून असते. विकसित आणि समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी युवा पिढीने सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. युवक-युवतींमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी यावेळी विशेष स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवित आयुष्यात कोणत्याही व्यसनाच्या आहारी न जाण्याची तसेच इतरांनाही व्यसनमुक्त जीवनासाठी प्रेरित करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन राष्ट्रीय सेवा योजना (हस्त) अधिकारी प्रा. शशिकांत राठोड यांनी केले. यावेळी क्षेत्रीय समन्वयक प्रा. सचिन वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.